जिल्हा उद्योग केंद्र, सांगली
(उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन )
उद्योग भवन, सांगली
दूरध्वनी व फॅक्स ०२३३/२६७२५२६
ई मेल- didicsangli@maharashtra.gov.in

---

**पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम २०१८-१९ (सभा क्र-१) जिल्हा कार्यबल समिती सभा दि.१७/०७/२०१८ रोजी संपन्न झालेल्या इतिवृत्त.**

---

**पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम २०१८-१९ जिल्हा कार्यबल समितीची सभा दि.१७/०७/२०१८ रोजी सकाळी १२.३० वाजता मा.अध्यक्ष परोनिका तथा जिल्हाधिकारी सो, सांगली यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, विजयनगर,सांगली येथे संपन्न झाली.**

---

**सभेस हजर सदस्य**

०१.मा. श्री. विजय काळम (भाप्रसे),
अध्यक्ष परोनिका तथा जिल्हाधिकारी, सांगली.

०२ मा. श्री.गुडस्कर
जिल्हा अग्रणी बँक अधिकारी, बँक ऑफ इंडिया, सांगली.

०३.मा. श्री. नितिन कोळेकर,
सदस्य सचिव परोनिका तथा महाव्यवस्थापक, जिउके.सांगली.

०४. श्री. आर.ए.बुचडे,
जि.ग्रा.अ.खादी ग्रामोद्योग, मंडळ, सांगली.

०५. .श्री. बी.एस.मलगटटी, ए.डी.
खादी ग्रामोद्योग आयोग, मुंबई.

०६.श्रीम.विद्या कुलकर्णी
व्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, सागंली

०७. श्री. आर.एम.मिरजकर,
लेखापरिक्षक, खादी ग्रामोद्योग, मंडळ, सांगली.

०८.श्री. एम.आर.मेडीदार,
उद्योग निरीक्षक, जिल्हा उद्योग केंद्र, सांगली.

०९.प्रतिनिधी
नेहरु युवा केंद्र सांगली

१०.श्री. बिळंगी
बँक अधिकारी, बँक ऑफ इंडिया, अग्रणी शाखा सांगली

## सभेपुढील विषय

**विषय क्र.१** – सन २०१८-१९ चा पीएमईजीपी प्राप्त लक्षांक व प्राप्त प्रस्ताव यावर चर्चा करणे

**निर्णय क्र.१-** सदस्य सचिव परोनिका तथा महाव्यवस्थापक जिउके, यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेची प्रस्तावना व प्राप्त प्रस्ताव व लक्षांक याबाबत सभेमध्ये विभाग निहाय आराखडा मांडला तो खालील प्रमाणे. दिनांक -१७/०७/१८ अखेर ची पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम प्रस्ताव स्थिती.

**(रक्कम रु लाखात)**

| अ.क्र. | यंत्रणेचे नांव | सन २०१८-१९ साठी एकूण प्राप्त उदिष्ठ | | सन १७-१८ चे बँकेकडे प्रलंबीत प्रस्ताव | | चालू वर्षात प्राप्त प्रस्ताव | | एकुण प्रस्ताव | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | खादी आयोग | ३७ | ९२.५० | ८२ | ३५७.६१ | ९७ | ४८८.०८ | १७९ | ८४५.६९ |
| २ | खादी ग्रामोद्योग मंडळ | ३३ | ८३.४३ | ३२ | ९३.३५ | ९४ | २९३.९३ | १२६ | ३८७.२८ |
| ३ | जिल्हा उद्योग केंद्र | ४१ | १०३ | ७७ | २०३.२० | ३४५ | ४९४.९४ | ४२२ | ६९८.१४ |
| | **एकुण-** | **१११** | **२७८.९३** | **१९१** | **६५४.१६** | **५३६** | **१२७६.९५** | **७२७** | **१९३१.११** |

गत वर्षी प्राप्त लक्षांकामध्ये सांगली जिल्ह्याने महाराष्ट्रात दुस-या क्रमांकाने कामकाज पुर्ण केल्याचे माहीती सादर केली असता, सभेमध्ये अध्यक्ष यांनी तिन्ही यंत्रणा व लक्षांक पुर्तीसाठी सहकार्य करणा-या बँकांचे खास अभिनंदन केले.

**विषय क्र.२** – सन २०१८-१९ चा पीएमईजीपी अंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जावर बँकेस प्राप्त प्रस्ताव पाठविणेबाबत...

**निर्णय क्र.२** - वरील चर्चे नंतर सन २०१८-१९ मधील प्राप्त प्रस्तावापैकी परीपुर्ण कागदपत्रे ऑनलाईन प्रणालीत अपलोड केलेले व योजनेच्या निकषात बसत असलेच्या प्रस्तावांची तिनही कार्यालयाकडील प्रकरणांची माहीती (यादी) सभेपुढे ठेवण्यात आली, सदर यादीनुसार चालु वर्षातील ५३६ चे मार्जीन मनी रप १२७६.९५ लाखची प्रकरणे बँकांना पाठविणेस मान्यता देण्यात आली. तसेच मिटीग तारखे दिवशी दि -१७/०७/१८ पर्यंत संगणक प्रणालीमध्ये प्राप्त झालेल्या प्रकरणांपैकी पात्र असणारे अर्जास शिफारशी करण्यास सभेत मान्यता देण्यात आली. सदर मान्यतेनुसार त्या तारखे अखेरची शिफारस केलेल्या प्रकरणांना कार्योत्तर मंजूरी पुढील सभेत घेण्यात यावी असे ठरले.

**विषय क्र.३** – सन २०१७-१८ मधील पीएमईजीपी अंतर्गत बँकेने नाकारलेले प्रस्ताव उद्योजक अथवा बँकेच्या मागणी प्रमाणे बँकेस मंजूरी करीता परत पाठविणेबाबत..

**निर्णय क्र.३-** सन २०१७-१८ मधील बँकाकडे पाठविलेल्या प्रस्तावापैकी नामंजूर केलेला प्रस्ताव काही बँका व उद्योजकांकडून परत मंजूरीसाठी पाठविणेस विनंती करण्यात येते, याबाबत सभेत चर्चा करण्यात आली. जर संबंधीत बँकेकडून लेखी सम्मंत्तीपत्र दिल्यास सदरचा प्रस्ताव बदल करावयाच्या बँकेकडे पुन्हा पाठविण्यात यावा असे सभेमध्ये ठरले. तसेच सन २०१७-१८ मधील प्रस्तावांपैकी सभेतारखे पुर्वी उद्योजकाच्या मागणी प्रमाणे बँक बदलून दिली असल्यास त्यास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच मार्च-१८ अखेर बँकांकडील प्रलंबीत प्रकरणे चालू अर्थीक वर्षात मंजूरी /नामंजूरीची कार्यवाही करण्यात यावी.

सन २०१८-१९ च्या आर्थीक वर्षामध्ये प्राप्त लक्षांकाचे सात पट प्रकरणे बँकांना पाठविण्यात यावीत असे ठरले.

वरील प्रमाणे चर्चेनंतर ऐन वेळचा विषय काही नसल्याने मा. सदस्य सचिव तथा महाव्यवस्थापक जिउके, सांगली यांनी सर्वांचे आभार मानले. व मा. अध्यक्षयांचे परवानगीने सभा संपलेचे जाहीर केले.

मा. सदस्य सचिव (पीएमईजीपी) तथा महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र सांगली.

7.8.18.

मा.अध्यक्ष, (पीएमईजीपी) कार्यक्रम,
जिल्हा कार्यबल समिती तथा जिल्हाधिकारी,
सांगली.